भारत-GCC ट्रोइका मंत्रीस्तरीय बैठक, न्यूयॉर्क (25 सप्टेंबर 2026)

संयुक्त राष्ट्र महासभेच्या 81 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर इंडिया-गल्फ कोऑपरेशन कौन्सिल (GCC) ट्रोइका मंत्रीस्तरीय बैठक आज न्यूयॉर्क येथे पार पडली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केले. GCC च्या वतीने ट्रोइका स्तरावर बहरीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहिम डॉ. अब्दुललतीफ बिन राशिद अल झायनी, GCC चे महासचिव माननी जासेम मोहम्मद अल्बुदाईवी आणि सौदी अरेबियाचे परराष्ट्र व्यवहार राज्य मंत्री माननीय आदेल अल-जुबैर यांनी प्रतिनिधित्व केले. तसेच यूएईच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य राज्यमंत्री महामहिम रीम अल हाशिमी, कतारचे परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री माननीय सुल्तान अल मुरैखी, ओमानच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील संघटना विभागाचे संचालक माननीय राजदूत मोहम्मद बिन अब्दुल्ला अल कुत्बी आणि कुवेतचे परराष्ट्र व्यवहार सहाय्यक मंत्री माननीय राजदूत हमद अल मारी यांनीही या बैठकीत सहभाग घेतला.

2. नेत्यांनी 09 सप्टेंबर 2024 रोजी रियाध येथे झालेल्या भारत-GCC धोरणात्मक संवादासाठीच्या पहिल्या संयुक्त मंत्रीस्तरीय बैठकीतील उपलब्धींवर पुढील कार्यवाही करण्याच्या आपल्या संयुक्त वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. भारत आणि GCC देशांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या दृढ आणि मैत्रीपूर्ण संबंध असून, त्यांना सशक्त व्यापार संबंध आणि मजबूत लोक-संपर्काचे पाठबळ असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी अधोरेखित केले. अलीकडच्या काळात व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, आरोग्य, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अशा विविध क्षेत्रांमध्ये भारत आणि GCC देशांमधील संबंध अधिक दृढ झाले आहेत. GCC प्रदेशात मोठ्या संख्येने परदेशस्थ भारतीय वास्तव्यास आहे. भारत आणि GCC यांच्यातील व्यापार आणि गुंतवणुकीत सातत्याने वाढ होत असून, 2025-26 या आर्थिक वर्षात एकूण व्यापार USD 178.66इतका झाला आहे.

3. नेत्यांनी भारत-GCC धोरणात्मक संवादासाठीच्या पहिल्या संयुक्त मंत्रीस्तरीय बैठकीत स्वीकारण्यात आलेल्या भारत-GCC संयुक्त कृती आराखडा (JAP) 2024-2028 च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या संयुक्त कृती आराखड्यात राजकीय संवाद, सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, कृषी आणि अन्नसुरक्षा, वाहतूक, ऊर्जा, आरोग्य, संस्कृती आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये संयुक्त उपक्रमांची रूपरेषा आखण्यात आली आहे. संयुक्त कृती आराखड्यातील विविध क्षेत्रे भारत आणि GCC देशांमधील सहकार्याची व्यापकता आणि खोली दर्शवित असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच, या क्षेत्रांमध्ये सहकार्य पुढे नेण्यासाठी होत असलेल्या सातत्यपूर्ण प्रगतीचे त्यांनी कौतुक केले.

4. फेब्रुवारी 2026 मध्ये संदर्भ अटी (ToR) अंतिम केल्यानंतर, भारत-GCC मुक्त व्यापार कराराच्या (FTA) वाटाघाटी सुरू झाल्याचे नेत्यांनी स्वागत केले. भारत आणि GCC यांच्यात मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर त्यांच्यातील व्यापाराची पूर्ण क्षमता खुली होण्यास या करारामुळे मदत होईल, तसेच जागतिक हितासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरेल, असे त्यांनी नमूद केले. यामुळे निर्यातीचा विस्तार आणि विविधीकरण सुलभ होण्याबरोबरच दोन्ही बाजूंमधील आर्थिक एकात्मता मजबूत होईल.

5. पश्चिम आशियातील अलीकडील संघर्षामुळे व्यापार मार्गांमध्ये व्यत्यय निर्माण झाला असतानाही GCC देशांनी भारताला ऊर्जा आणि खतांचा पुरवठा सुरू ठेवल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी त्यांचे आभार मानले. नवीकरणीय, जैव-इंधने आणि हरित तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये सहकार्याचा विस्तार करण्यासह भारत-GCC ऊर्जा भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या गरजेवर देखील त्यांनी भर दिला.

6. कला, वारसा, योग, संगीत, चित्रपट आणि साहित्य या क्षेत्रांमध्ये संयुक्त उपक्रमांच्या माध्यमातून लोक-संपर्क मजबूत करण्याच्या महत्त्वावर नेत्यांनी भर दिला. पश्चिम आशियातील अलीकडील संघर्षादरम्यान परदेशस्थ भारतीयांच्या कल्याणासाठी तसेच त्यांच्या सुरक्षिततेची आणि हिताची काळजी घेतल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी GCC देशांचे कौतुक केले.

7. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही नेत्यांनी विचारांची देवाणघेवाण केली. पश्चिम आशियातील परिस्थिती, आंतरराष्ट्रीय जलमार्गांमधील व्यापारी शिपिंग समोरील आव्हाने, बहुपक्षीय संस्थांमध्ये सुधारणा करण्यासाठीचे प्रयत्न तसेच शाश्वतता आणि दहशतवाद यांसारख्या समकालीन आव्हानांना सामोरे जाण्याबाबत चर्चा करण्यात आली. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी प्रादेशिक शांतता आणि सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित केले तसेच संघर्षांचे निराकरण करण्यासाठी संवाद आणि राजनैतिक मार्गांचा अवलंब करण्याच्या प्रयत्नांवर भर दिला.

8. भारत-GCC धोरणात्मक संवादासाठीची दुसरी संयुक्त मंत्रीस्तरीय बैठक लवकरात लवकर आयोजित करण्यास उभय बाजूंनी सहमती दर्शविली.

न्यूयॉर्क

25 सप्टेंबर 2026